# ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद गोंदिया

(ई-मेल आय.डी. eebngondia@gmail.com, eebngondia@rediffmail.com)

ग्राम स्तरावरील लाभार्थ्यांना आर्थिक दृष्टीने परवडणाऱ्या व देखभाल दुरुस्तीला सुलभ अशा योजनांची निर्मिती करुन शुध्द तसेच पुरेसा पाणी पुरवठा सातत्याने करणे हे ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे प्रमुख ध्येय आहे. यामध्ये सर्व अस्तित्वातील साधने/संसाधने व उद्‌भव, नैसर्गीक आपत्तीमधे सुध्दा (जसे की, टंचाई, पुरपरिस्थिती इ.) सक्षम राहतील याची वेळीच दखल घेणेसुध्दा समाविष्ट आहे. जिल्हयामध्ये पाणी पुरवठा विषयक धोरण राबवितांना आवश्यक असलेले तांत्रिक सहाय्य पुरविण्या समवेतच ग्रामस्थ/लाभार्थ्यांना पाणी पुरवठा योजनेच्या विविध उपांगांच्या देखभाल दुरुस्ती करीता सक्षम करणे व योजनेच्या मालकी हक्काबाबतची जाणीव निर्माण करणे तसेच पाणी पट्टी आकारणीची रक्कम न चुकता भरण्याकरिता सक्षमीकरण करण्याचे सुध्दा नियोजित आहे.

गोंदिया जिल्हयात उपलब्ध पाणी पुरवठा साधनांची माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र | ठळक माहिती |
|---|---|
| १ | एकुण हातपंप :- ९१०७ |
| २ | एकुण विजपंप :- १५१ |
| ३ | एकुण सोलर पंप :- ३८७ |
| ४ | एकुण साध्या विहीरी :- ४४८६ |
| ५ | स्वंतत्र नळ योजना -गावे/वाडया :- ३६६ योजना (३९६ गावे/वाड्या) |
| ६ | प्रादेशिक नळ योजना :- १५ (जि.प.- ४, मजीप्रा- ५ व पाणी मंडळ- ६) |

ग्रामीण पाणी पुरवठा विभागा अंतर्गत ३ ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग (गोंदिया, देवरी व नवेगावबांध) व १ यांत्रिकी उपविभाग कार्यरत आहेत. सदर तीनही उपविभागांतर्गत नळ पाणी पुरवठा योजनेची कामे करण्यात येत असुन यांत्रिकी उपविभागामार्फत विंधण विहीर/हातपंप, सौर उर्जेवर आधारीत दुहेरी पंप या कार्यक्रमांची अमलबजावणी करण्यात येते.

ग्रामीण पाणी पुरवठा विभागा अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांची उद्दिष्टये खालील प्रमाणे आहेत

१. जिल्हयात गावाच्या मागणी प्रमाणे नळ पाणी पुरवठा योजना, विंधन विहीरी, हातपंप इ. योजनांद्वारे प्रत्येक गावाला ४० ली. प्रती माणसी/प्रती दिवस शुध्द व मुबलक पाणी उपलब्ध करुन देणे.
२. पाणी पुरवठ्याकरीता निर्माण केलेल्या साधनाद्वारे सातत्याने पाणी पुरवठा होणे करीता सदर साधनांचे पंचायत समिती स्तरावरुन होत असलेल्या देखभाल दुरुस्तीचे संनियंत्रण व व्यवस्थापन करणे.
३. वरीष्ठ भुवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांच्या समन्वयाने उद्‌भव बळकटीकरण करणे तसेच प्रत्येक वर्षी पाणी टंचाई भासणाऱ्या संभाव्य गावे/वाड्यात उपाययोजनांची आखणी व अमलबजावणी करणे.
४. निर्मिती प्रक्रियेत असलेली संसाधने, गुणवत्ता पुर्ण व विहित कालावधीत पुर्ण करुन त्याद्वारे पाणी पुरवठा सुरु करणे याकरीता देखील हा विभाग कटिबध्द आहे.

उपरोक्त उद्दिष्ट्ये पुर्ण करण्याकरीता ग्रामीण पाणी पुरवठा विभागा अंतर्गत खालील प्रमाणे योजना राबविण्यात येतात.

**१) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम :-**

**अ) स्वरुप :-** आर्थिक वर्ष सन २००९-१० पासुन वर्धित वेग ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाचे रुपांतर केंद्र शासनाने राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम असे करुन देशातील ग्रामीण भागातील लोकांना शुध्द व मुबलक पाणी पुरवठा करण्याचे उद्दिष्ट हाती

घेतले. वर्ष २०१० पासुन राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम मार्फत ग्रामीण भागातील सर्व गावांमध्ये नळ पाणी पुरवठा योजनाद्वारे ४० ली./माणसी/दिवस प्रमाणे शुध्द पाणी पुरवठा करण्याचे लक्ष ठेवण्यात आले आहे.

ज्या गावामध्ये सध्या पिण्याचे पाणी पारंपारीक स्त्रोतांद्वारे प्राप्त करण्यात येते अशा गावांमध्ये गावाच्या मागणी नुसार नविन नळ पाणी पुरवठा योजना तयार करुन गावातील सर्व घरांपर्यंत पाईप लाईन द्वारे पाणी पुरवठा करणे, तसेच ज्या गावामध्ये जुनी नळ पाणी पुरवठा योजना उपलब्ध आहे परंतु कार्यान्वित नसेल अशा गावांकरीता योजना पुर्नजिवीत करुन सदर गावांना शुध्द व मुबलक पाणी पुरवठा करण्यात येतो. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत योजना घेण्याकरीता ग्रामसभेचा मागणी ठराव व गाव कृती आराखड्यासह प्रस्ताव उपविभागास सादर करावयाचा असतो. शासनाने ठरवुन दिलेल्या प्राधान्य क्रमांनुसार गावांचे सर्वेक्षण करुन आवश्यकतेनुसार गाव राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या कृती आराखड्यात समाविष्ट करण्यात येतो. सदर आराखड्यास राज्य स्तरीय समिती द्वारे मान्यता प्रदान करण्यात येते. त्यानुसार अंदाजपत्रकास तांत्रिक मंजुरी व तद्नंतर प्रशासकीय मंजुरी सक्षम अधिकारी/प्राधिकाऱ्यांकडून प्रदान करण्यात येते. त्यानंतर जिल्हा परिषदेकडून सदर कामांची निविदा करण्यात येत असुन कामाची अंमलबजावणी करण्यात येते.

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत कामे प्रस्तावित झाल्यानंतर कामाची मंजुरी केंद्र शासना मार्फत प्राप्त होत असते. योजनेच्या अंमलबजावणीची जबाबदारी आतापर्यत ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची होती. तसेच योजनेवर झालेल्या आर्थिक व्यवहाराची जबाबदारी ग्राम सामाजिक लेखा परिक्षण समितीची होती. परंतु दिनांक ९ मार्च २०१८ च्या शासन निर्णयानुसार ग्रामपंचायतीचे अधिकार काढण्यात आले असुन नविन योजनांची अंमलबजावणी व आर्थिक व्यवहाराची जबाबदारी जिल्हा परिषदेची राहणार आहे. योजना पुर्ण झाल्यानंतर सदर योजनेची देखभाल व दुरुस्ती १००% गावाने करावयाची आहे.

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत मंजुर झालेले योजनांकरीता लागणारा निधी केंद्र शासनाकडून ५० टक्के व राज्य शासनाकडून (जिल्हा वार्षिक योजना) ५० टक्के प्रामणे प्राप्त होतो. शासनाद्वारे प्राप्त निधीचा उपलब्धते नुसारच ग्रामपंचायतीला निधी वितरीत करण्यात येत असतो. दिनांक १७ मार्च २०१० च्या शासन निर्णयान्वये योजनेकरीता ४ हफ्त्यात निधी जिल्हा परिषदेकडून ग्रामपंचायतीस वितरीत करण्यात येत होता. परंतु ९ मार्च २०१८ च्या शासन निर्णयान्वये नविन योजनांकरीता ४ हफ्त्यात निधी सरळ कंत्राटदारास वितरीत करण्यात येणार आहे (प्रथम हफ्ता ३०%, दुसरा हफ्ता ३०%, तिसरा हफ्ता ३०% व चौथा हफ्ता १०%).

**ब) लाभार्थ्याची पात्रता :-**

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमासाठी गावांची/वाड्यांची निवड खालील निकषानुसार करण्यात याते.

१. पिण्याच्या पाण्याचा सार्वजनिक अथवा खाजगी उद्‌भव नसलेली गावे/वाड्या.
२. सपाट प्रदेशात १.६ कि.मी. अंतरावर व डोंगराळ प्रदेशात १०० मीटर उंच अतरापर्यंत पिण्याच्या पाण्याचा सार्वजनिक अथव खाजगी उद्‌भव नसलेली गावे/वाड्या.
३. जेथे पाण्याचे उद्‌भव उपलब्ध आहेत परंतु तेथील पाण्याची गुणवत्ता अयोग्य आहे अशी गावे/वाड्या. उदा. अतिक्षार, लोह, फ्लोराईड, आर्सेनिक किंवा इतर विषारी पदार्थाचे अतिरिक्त प्रमाण आणि जैविकदृष्ट्या दुषित.
४. जेथे पाणी पुरवठा उपलब्ध आहे, परंतु विहित निकषापेक्षा कमी आहे अशी गावे/वाड्या (४० लिटर दरदिवशी दरडोई दरमाणशी पेक्षा कमी.)
५. लोकसंख्या वाढीमुळे पाणी ४० ली. प्रती माणसी/प्रती दिवस उपलब्ध होऊ न शकलेली गावे.

**क) प्राधान्यक्रम (गाव निवडीचे निकष)**

१. टँकर्सद्वारे पाणी पुरवठा करण्यात येणारी गावे.
२. १० ली. प्रती माणसी/प्रती दिवस पेक्षा कमी पाणी उपलब्ध होत असलेली गावे.

३. पाणी गुणवत्ता बाधीत असलेली गावे.

४. ४० ली. पेक्षा प्रती माणसी/प्रती दिवस पेक्षा कमी पाणी उपलब्ध होत नसलेली गावे.

५. आवश्यकतेनुसार गावाची मागणी असलेली गावे.

**ड) अर्जाचा नमुना :-** अर्जाचा नमुना सोबत जोडण्यात आलेला आहे.

**इ) सोबत जोडावयाची कागदपत्रे :-**

१. ग्रामपंचायतीचा, ग्रामसभेचा योजना मागणी अर्ज व ठराव.

२. योजना पुर्णत्वानंतर योग्य पाणी पट्टी बसवुन योजनेची देखभाल, दुरुस्ती व व्यवस्थापनाची १००% खर्चाची जबाबदारी स्विकृत करण्याबाबतचा ठराव.

३. गाव कृती आराखडा.

४. अस्तित्वातील पाणी पुरवठा संसाधनाची देखभाल व दुरुस्ती करण्याबाबतचा ठराव.

५. महीला ग्रामसभेचा ठराव.

६. पाण्याचा ताळेबंद (water budget).

७. उद्‌भवाकरीता व टाकीकरीता जागेचा सातबारा.

**ई) अर्ज कोणाकडे सादर करावे :-** वरील प्रमाणे आवश्यक कागदपत्रासहीत सविस्तर मागणी प्रस्ताव संबंधित ग्रामीण पाणी पुरवठा उपविभागास सादर करावा.

**प्रगती अहवाल :-** सन २०१८-१९, माहे नोव्हेंबर अखेर ६ योजनांद्वारे पाणी पुरवठा सुरु करण्यात आला असुन २८ योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत.

**२) मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम :-**

**अ) स्वरुप :-** राज्यातील ग्रामीण व निमशहरी भागातील दिर्घकालीन गरजांचा व आरोग्याचा विचार करुन ग्रामीण जनतेस पुरेसे व शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने राज्याचा स्वतःचा सर्वसमावेशक असा, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या धर्तीवरच मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम राज्यभरात सन २०१६-१७ ते २०१९-२० या चार वर्षासाठी राबविण्यात येत आहे. सदर कार्यक्रमासाठी १०० टक्के निधी राज्य शासनाकडून प्राप्त होतो.

राज्यातील ग्रामीण जनतेस पुरेसे व शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देणे तसेच राज्यातील ग्रामीण व निमशहरी भागात पाणी पुरवठा योजना राबविणे हे या कार्यक्रमाचे मुख्य उद्देश आहे. मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत हाती घ्यावयाच्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांना सक्षम प्राधिकाऱ्यांकडून तांत्रिक मान्यता व त्यानंतर प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येते.

**ब) लाभार्थ्याची पात्रता (गाव निवडीचे निकष) :-** मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत प्रामुख्याने खालील प्रमाणे कामे हाती घेण्यात येतात.

१. अस्तीत्वातील जुन्या पाणी पुरवठा योजना कार्यान्वीत करणे, अस्तित्वातील योजनेतील योग्य उपांगे नविन योजनेसाठी उपयोगात आणणे व गावाच्या मागणीनुसार नविन योजना घेणे.

२. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत बंद असलेल्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचे पुनरुज्जीवन.

३. प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची देखभाल दुरुस्ती.

**क) अर्जाचा नमुना :-** राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाप्रमाणे.

**ड) सोबत जोडावयाची कागदपत्रे :-** राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाप्रमाणे.

**इ) अर्ज कोणाकडे सादर करावे :-** राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाप्रमाणे.

**प्रगती अहवाल :-** सन २०१८-१९, माहे नोव्हेंबर अखेर ३३ योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत.

**३) पाणी टंचाई कार्यक्रम :-**

**अ) स्वरुप :-** जिल्हयातील पाणी टंचाई निवारणार्थ प्रत्येक वर्षी पाणी टंचाई कार्यक्रमांतर्गत, पाणी टंचाई आराखडा तयार करुन ज्या गावांना ऑक्टोंबर ते जुन या कालावधीमध्ये पाणी टंचाई भासते अशा गावांचा पाणी टंचाई आराखड्यामध्ये समावेश केला जातो व आवश्यकतेनुसार उपाययोजना करण्यात येतात. १) शासन निर्णय क्रमांक टंचाई - १०९९/प्र.क्र. १२/पापु-१४, दिनांक ३ फेब्रुवारी १९९९ १) शासन परिपत्रक क्र. टंचाई १००८/प्र.क्र. १६८/पापु-१४, दिनांक २४.१०.२००८ ३) शासन परिपत्रक क्रमांक - टंचाई २०१८/प्र.क्र. १८३/पापु-१४, दिनांक २८.०९.२०१८, महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई, यांच्या नुसार पाणी टंचाई आराखडा तयार करण्यात येतो.

पाणी टंचाई आराखडा सर्व पंचायत समिती स्तरावर गटविकास अधिकारी व तहसिलदार यांचे संयुक्त स्वाक्षरीने कार्यकारी अभियंता यांचेकडे सादर करण्यात येतो. त्यानंतर आराखड्यातील गावांची तपासणी करुन आवश्यकतेनुसार खालील प्रकारच्या उपाययोजना प्रस्तावित करण्यात येतात व कामे पुर्ण करण्यात येतात. खालील सर्व उपाययोजनांपैकी कमी खर्चाची योजना सर्वेक्षण करुन आवश्यकतेनुसार गावांसाठी राबविण्यात येते व गावांची पाणी टंचाईची समस्या सोडविण्यात येते.

१. विंधण विहीर/कुपनलिका घेणे.
२. नळ योजनांची विशेष दुरुस्ती करणे.
३. विंधण विहीरींची विशेष दुरुस्ती करणे.
४. तात्पुरती पुरक नळ योजना घेणे.
५. खाजगी विहीर अधिग्रहण करणे.
६. विहीर खोल करणे/गाळ काढणे.
७. बुडक्या घेणे.
८. टॅकरने/बैलगाडीने पाणी पुरवठा करणे.

**ब) लाभार्थ्याची पात्रता :-** पाणी टंचाई कार्यक्रम हा ज्या गावांना उन्हाळयाच्या दिवसांमध्ये २० ली./माणसी पेक्षा कमी पाणी उपलब्ध होते अशा गावांचाच पाणी टंचाई आराखड्यात समावेश करण्यात येतो. त्याकरीता संदर्भ क्रमांक २ अन्वये ग्रामसभेच्या ठरावाची नमुना प्रत गटविकास अधिकारी यांचेकडे सादर करण्यात येते. सदर माहीतीच्या आधारे गटविकास अधिकारी यांचे कडून सदर गावांची माहीती प्रपत्र अ मध्ये भरुन कार्यकारी अभियंता कार्यालयास सादर करण्यात येते. त्यानुसार गावांचे प्रत्यक्ष सर्वेक्षण करुन उपाययोजना प्रस्तावित करुन गावाचा पिण्याचे पाण्याचा प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न करण्यात येतो.

**क) अर्जाचा नमुना :-** सरपंच व ग्रामसेवक यांचे संयुक्त स्वाक्षरीने पिण्याचे पाण्याचे टंचाई घोषीत करण्याबाबतचा ठरावाचा नमुना.

**ड) सोबत जोडावयाची कागदपत्रे :-** पिण्याचे पाण्याची टंचाई घोषीत करण्याबाबतचा ग्रामसभेच्या ठरावाचा नमुना.

**इ) अर्ज कोणाकडे सादर करावे :-** गटविकास अधिकारी, पंचायत समिती.

**४) आमदार/खासदार निधी कार्यक्रम :-**

**अ) स्वरुप :-** ग्रामीण पाणी पुरवठा विभागा अंतर्गत मा. आमदार/खासदार यांच्याद्वारे त्यांच्या कार्यक्षेत्रातील सुचविण्यात आलेल्या बोरवेल कामांचे सर्वेक्षण करुन कांमांचे अंदाजपत्रक जिल्हा नियोजन कार्यालय गोंदिया यांचेकडे सादर केली जातात. त्यावर मा. जिल्हाधिकारी गोंदिया यांचे कडून प्रशासकीय मान्यता प्रदान झाल्यानंतर कामे पुर्ण केली जातात.

**ब) लाभार्थ्याची पात्रता :-** मा. आमदार/खासदार यांनी सुचविलेले ठिकाण.

**क) अर्जाचा नमुना :-** मा. आमदार/खासदार यांनी दिलेली लेखी सुचना.

**ड) अर्ज कोणाकडे सादर करावे :-** मा. आमदार/खासदार यांच्या लेखी सुचनेनुसारच कार्यवाही केली जाते.

**इ) सन २०१७-१८ मध्ये केलेली कामे :-** सन २०१७-१८ अंतर्गत एकुण खासदार निधी कार्यक्रम अंतर्गत ५५ व आमदार निधी कार्यक्रम अंतर्गत एकुण ३०० कामे करण्यात आली. सदर कार्यक्रमांतर्गत एकुण रु. १५६.८८ लक्ष वितरीत करण्यात आलेला आहे.

**३) योजनांच्या निधीबाबत आर्थिक वर्ष- २०१७-१८:-**

(रु. लाखात)

| अ.क्र. | योजनेचे नाव | सन २०१७-१८ | | २०१८-१९ (ऑक्टोंबर अखेर) | |
|---|---|---|---|---|---|
| | | प्राप्त निधी | खर्च | प्राप्त निधी | खर्च |
| १ | राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम | १९९४.०९ | १५११.६६ | | |
| २ | मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम | ०.०० | ०.०० | ६८३.०१ | २२३.५१ |
| ३ | पाणी टंचाई कार्यक्रम | ६.६० | ४.८८ | ०.०० | ०.०० |
| ४ | आमदार/खासदार कार्यक्रम | १७९.३३ | ७५.४५ | ०.०० | ०.०० |
| | एकुण | २१८०.०२ | १५९१.९९ | ६८३.०१ | २२३.५१ |

**४) तक्रार निवारण कार्यालय :-**

| अ.क्र. | नोडल अधिकारी | कार्यालयाचे नाव, पत्ता व दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|
| १ | श्री. प्रशांत के. टेंभुरकर उप कार्यकारी अभियंता (प्र.), जिल्हा परिषद गोंदिया | ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद गोंदिया, फुलचुर पतंगा मैदान गोंदिया, दुरध्वनी क्रमांक : ०७१८२ - २३१५५४ |

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये जिल्हा स्तरावरील शासकीय माहिती अधिकारी, सहाय्यक माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांची माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव, पत्ता व दुरध्वनी क्रमांक | माहिती अधिकाऱ्याचे नांव, पदनाम, पत्ता व दुरध्वनी क्रमांक | सहाय्यक माहिती अधिकाऱ्याचे नांव, पदनाम, पत्ता व दुरध्वनी क्रमांक | प्रथम अपिलीय अधिकाऱ्याचे नांव, पदनाम, पत्ता व दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद गोंदिया, फुलचुर पतंगा मैदान गोंदिया, दुरध्वनी क्रमांक : ०७१८२ - २३१५५४ | श्री. मुकेश वासनिक, सहाय्यक प्रशासन अधिकारी, जिल्हा परिषद गोंदिया | श्री. जे.एच. भोयर कनिष्ठ सहाय्यक जिल्हा परिषद गोंदिया | श्री. एस.के. शेगांवकर, कार्यकारी अभियंता (ग्रापापु) जिल्हा परिषद गोंदिया |

**५) सुचना/सुझाव करावयाचा पत्ता :-**

१. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद गोंदिया, फुलचुर पतंगा मैदान गोंदिया.
२. उपविभागीय अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग देवरी, जिल्हा परिषद गोंदिया.
३. उपविभागीय अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग गोंदिया, जिल्हा परिषद गोंदिया, फुलचुर पतंगा मैदान गोंदिया.
४. उपविभागीय अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग नवेगावबांध, जिल्हा परिषद गोंदिया.

======०००======